# पंडीत नेहरू आणि राष्ट्र उभारणी

श्री. अनिल विठ्ठल हंकारे, राज्यशास्त्र विभाग, संशोधक विद्यार्थी , शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

---

प्रस्तावना (Introduction) – लाल किल्ल्यावरून भारतीय ध्वज प्रथम फडकावून पंडीत जवाहरलाल नेहरू हे भारताचे पहिले पंतप्रधान झाले होते. स्वातंत्र्य लढ्यातील नेहरू, भारतरत्न मिळालेले नेहरू, संसदीय लोकशाही यशस्वी करणारे नेहरू, राज्यपद्धत व्यवस्थित हाताळणारे नेहरू, देशातील विविध उच्चसंस्था निर्माण करणारे नेहरू, विज्ञान तंत्रज्ञानाची उभारणी करणारे नेहरू अशा पद्धतीचे आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे पंडीत जवाहरलाल नेहरू होय. नियोजन आयोगाची निर्मिती करून भारताची राष्ट्रउभारणी पंडीत नेहरुंनी भारत स्वतंत्र झाल्यानंतर केलेली दिसून येते. राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शैक्षणिक दृष्टीकोन यांच्या विचारगाभ्यातूनच राष्ट्राची प्रगती जसजशी वाढत गेली तसे नेहरूचे नाव अधिकच विकसित होत गेले. या सर्वांचा आढावा प्रस्तुतच्या शोध निंबधात करण्यात येत आहे.

विषय विवेचन (Subject Discussion) –

भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याकरता पंडीत जवाहरलाल नेहरू यांचेही नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. चाचा नेहरू या नावाने त्यांची प्रसिद्धी तत्कालीन भाषणाद्वारे वृद्धिंगतझालेली दिसते. सुरवातीला जवाहरलाल नेहरू हे १९१७ ला होमरूल चळवळीत सहभागी झाले, आणि त्याच वेळी महात्मा गांधी सोबत त्यांचा परिचय झाला. महात्मा गांधी त्यावेळी रौलेट कायद्या विरोधात एक चळवळ सुरू केली होती. महात्मा गांधीजींच्या शांतीपूर्वकचळवळीने नेहरू हे फारच प्रभावित झालेले होते. महात्मा गांधी हे एक आपले आदर्श आहेत आणि त्यानंतर विदेशी वस्तूंचा त्याग करून खादी वस्तू वापरू लागले. शांतताप्रिय नेहरू म्हणून तेव्हापासूनच त्यांची ओळख निर्माण झाली. असहकार आंदोलनाला पाठिंबा देत असताना त्यांना अटक देखील झालेली होती. म्हणजेच, राष्ट्रउभारणीची सुरवात ही अशी संघर्षमय पद्धतीने दिसून येते. पूर्ण स्वराज्याची मागणी करणे हे देखील नेहरूंच्या मागणीवरून त्यांचे देशप्रेम दिसून येते. पंडीत नेहरू आणि सुभाषचंद्र बोस यांनी १९२८-२९ ला पूर्ण राजकीय स्वातंत्र्याच्या मागणीचे समर्थन केले होते. १९२९ ला लाहोर येथे काँग्रेस चे वार्षिक अधिवेशन आयोजित करण्यात आले होते त्यावेळी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष म्हणून नेहरूची निवड झाली होती, आणि या सत्रामध्येच पूर्ण स्वराज्याची मागणी करणारा प्रस्ताव पास करण्यात आलेला होता. या कालावधीपर्यंत नेहरूंना राजकीय ज्ञान चांगल्या पद्धतीने प्राप्त झाले होते. विविध विषयांवर त्यांची पकड अतिशय मजबूत झालेली होती. १९३६-३७ ला पंडीत नेहरू काँग्रेस अध्यक्ष म्हणून राहिले. १९४२ साली भारत छोडो आंदोलनादरम्यान नेहरूंना अटक करण्यात आलेली होती. १९४५ साली त्यांची तुरूंगातूनसुटका करण्यात आली. १९४७ साली अनेक भारतीय लोक यांना आपले आदर्श मानत होते. महात्मा गांधीजींना नेहरू यांनी आदर्श मानलेले होतेच परंतु राजकारणात आल्यानंतर धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन गांधीजींच्या धार्मिक आणि पारंपारिक दृष्टिकोणापेक्षा थोडा वेगळा असलेला पाहायला मिळतो. नेहरु पंतप्रधान झाल्यानंतर सलग तीन वेळा पंतप्रधान पदावर विराजमान राहिले. आता सध्या विचार करत असताना नेहरूंना त्यावेळी नेतृत्व गुणाला वाव देण्यासाठी अनेक भारतीय लोक आणि महात्मा गांधीजी सारखे नेते यांनी सहकार्य केलेले दिसून येते. त्यावेळेची राजकीय उलथापालथ ही काही वेळा चर्चेत असते, पण नेहरूचा प्रतिभासंप्पन नेतृत्व या राजकीय उलथापालथीला मागे पाडून पुढेच गेलेले दिसून येते. देशाच्या विकासाकरता अनेक महत्त्वपूर्ण निर्णय देशविकासासाठी नेहरूंनी घेतलेले दिसतात. विज्ञान व औद्योगिक विकास, निरपेक्ष आंदोलन, कोरिया युद्ध, स्वेज नदी विवाद सोडवणे, कांगो करार अशा पद्धतीचे महत्त्वपूर्ण निर्णय घेतलेले होते, आणि ते देशविकासासाठी अतिशय महत्त्वाचे मानले गेले होते.

उत्तम लेखक म्हणूनही पंडीत नेहरू हे प्रसिद्ध होते. भारत और विश्व, सोवियत रूस, विश्व इतिहास की एक झलक, भारतीय एकता और स्वतंत्रता, Glimpses of world history, Discovery of India, अशा पद्धतीचे लेखन नेहरूंनी केले होते. सिंधू सभ्यता, भारताचे स्वातंत्र्य, भारतीय संस्कृती, धर्म आणि संघर्षाचे लेखन संपूर्ण जगाला देवू केले होते. नेहरूंनी केलेल्या लेखनात इतिहासाकडे पाहण्याची शैक्षणिक दृष्टी दिसून येते. मानवाची प्रगती, वैभव व वीरकृत्यांच्या गौरवशाली कालखंडाबरोबर जुलमी अधोगतीच्या आणि अवनतीच्या कालखडांवरही अभ्यासू दृष्टीने प्रकाश टाकलेला दिसतो. आणि या लिखाणात काही बोध घेण्याचा हेतू दृष्टीआड होवू दिला नाही. वर्तमानकाळाची पूर्ण जाणीव असल्याशिवाय भुतकाळातील इतिहासातून आपल्याला नविन काही शिकता येणार नाही. याची योग्य जाणीव नेहरूंना होती. discovery of India या ग्रंथात नेहरूंनी अतिप्राचीन काळापासून सध्य स्थिती पर्यंतचा इतिहास संक्षिप्तपणे मांडला असून

भारताच्या इतिहासातील प्रेरणांचे धागेदोरे जुळवून त्यांची तात्वीक प्रार्श्वभुमी काय आहे याचा नव्याने शोध घेतलेला आहे. आजही या ग्रंथांचा मार्गदर्शनात्मक उपयोग हा होतोच. जागतिक, आदिभौतिक, वैचारिक क्रांती, दोन महायुद्ध्ये भारतीय राजकीय व आर्थिक आंदोलने, काँग्रेसची वृद्धी, टिळक, गांधी, टागोर इत्यादींची थोरवी व कार्ये हिंदू मुस्लिम यांच्यातील दुही, समाजवादाचा उदय, स्वातंत्र्याचीइष्टता व अपरीहर्यता, सामाजिक पुनर्रचना, राष्ट्रीय नियोजन व्यवस्था, धर्म, तत्त्वज्ञान, भौतिक शास्त्रे, वैचारिकता, इत्यादी अनेक विषयांचे त्यांनी लेखन केलेले आहे. यातून आजही हे लेखन उपयुक्त ठरत आहे.

पंडीत नेहरू यांच्या मृत्यूची घटना भारताला खूप नूकसानकारक ठरलेली होती. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कालावधीत सोवियत युनियन मधील नियोजन आयोगाच्या धर्तीवर भारतात १५ मार्च १९५० रोजी नियोजन आयोग स्थापन करण्यात आले. कम्युनिस्ट सोवियत युनियन 'केंद्रिंत आणि नियोजित'अर्थव्यवस्थेच्या मॉडेलवरून हे नियोजन आयोग स्थापन झाले. स्वातंत्र्य लढा आणि त्यानंतरची फाळणी यामुळे देशाची विस्कटलेली घडी बसवण्यासाठी सुद्धा नियोजन आयोग अतिशय उपयुक्ततेचे ठरलेले होते. या नियोजन आयोगातून पंचवार्षिक योजनांचा आराखडा करून राज्याच्या योजनांना मान्यता देणे, केद्रिंय निधींचे राज्यांना वितरण करणे, विकास योजनांबाबत केंद्रसरकारला शिफारशी करणे, यासारखे उद्देश देशाला राष्ट्रउभारणीसाठी अत्यंत महत्तवाचे होते. भांडवल व मानवी संसाधनाचा संतुलित वापर करणे, देशातील भौतिक सुविधा यांचा वापर करणे हे नियोजन मंडळाचे प्रमुख कार्य होते. गेल्या ६५ वर्षात बारा पंचवार्षिक आणि सहा वार्षिक योजना सादर केल्या आहेत. २०० लाख कोटीहून अधिक निधीचे वाटप करण्यात आलेले आहे. अगदी सुरवातीच्या काळात १९५१ च्या पहिल्या पंचवार्षिक योजनेत दोन हजार कोटींची तरतुद करण्यात आलेली होती. या योजनेतून नेहरू यांनी गरीबीतून मुक्त देश करण्याचे आव्हान स्वीकारले होते. असा धाडसी उपक्रम पंडीत नेहरूंनी घेतलेला होता. दुसऱ्या महायुद्धानंतर आर्थिक कमजोरी आणि विभाजित झालेला भारत यांना नवनियुक्त पणे चांगला करण्यासाठी नेहरूंनी दुरदृष्टी आणि समग्रतेचा विचार करून पंचवार्षिक योजना तयार केली. १९८० मध्ये पंडीतजींचे दुसरे महत्त्वाचे काम लोकशाही मजबूत करणे हा होता. आणि आत्ताची परिस्तिथी पाहिली तर भारत एक लोकशाही प्रधान देश म्हणून त्यावेळी ही ओळखत होता आणि आत्ताही तो लोकशाही प्रधान म्हणूनच ओळखला जातो. असे करण्यात अनेक भारतीयांमध्ये नेहरूंचा देखील खूप मोठा वाटा आहे. भारताला योग्य रुपात ओळखणे आणि आंतरराष्ट्रीय घटनामध्ये जी काही कामगिरी नेहरू यांनी केली यातच नेहरूंचे मोठेपण दिसून येते.

भारतात स्वातंत्र्योत्तर काळात दारिद्र्य, निरक्षरता, अन्नधान्य टंचाई, सामाजिक व आर्थिक विषमता इत्यादी असताना देखील भारताला नवीन समाज तयार करण्याचे बळ देणारे आणि प्रत्यक्षात हा समाज तयार होत असताना कृतीशील प्रयत्न करणारे नेतृत्त्व म्हणून भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्याकडे पाहिले जाते. लोकशाही, समाजवाद, सहिष्णुता, धर्मनिरपेक्षता इत्यादी मुल्यांना भारतीय समाज व्यवस्थेत पुढे आणण्याचे कार्य त्यांनी केले. आंतरराष्ट्रीय राजकारणात सुद्धा भारताची एक वेगळी ओळख नेहरूंनी त्यावेळी सिद्ध करून दाखवलेली होती. स्वतंत्र भारताला दूरदृष्टीकोनातून योग्य आणि मार्मिक दिशा त्यांनी प्राप्त करून दिली होती. नियोजन आयोग व पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून देशाचे अर्थकारण व उद्योगधंदे मोठ्या प्रमाणात उभे केलेले दिसून येतात. म्हणूनच नेहरूंचे कार्य वैज्ञानिक दृष्टीकोन व कर्तृत्वाचे नेतृत्व यांचे भारताच्या जडणघडणीत निश्चितच सिंहाचा वाटा आहे. पंचवार्षिक योजनांमुळे भारताच्या परकीय चलनात वाढ झाली, पर्यायाने भारताची अर्थव्यवस्था विस्तारीत होण्यास चांगलीच मदत झाली, पण या पंचवार्षिक योजनेत काही कारणांमुळे तोटेही झालेले दिसून येतात. पण नेहरूंनी मात्र भारताच्या आर्थिक विकासासाठी सामाजिक भावनेने पुरेपुर प्रयत्न केलेले दिसून येतात. अलिप्त वाद हा भारताच्या परराष्ट्र धोरणाचा मुख्य आधारस्तंभ होता. अलिप्तवादाचा स्वीकार करण्यापाठीमागे नेहरू यांची भुमिका शांतता रक्षण हा भारतापुढील महत्त्वाचा उद्देश आहे. याच उद्देशाला अनुसरून आम्ही अलिप्ततेचा मार्ग अवलंबलेला आहे. आपल्या समोर निर्माण झालेल्या समस्या या होकारात्मक आणि कृतीशीलतेच्या मार्गाने सोडवणे म्हणजेच अलिप्तता मार्ग होय.

आपल्या देशाचा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिक विकास घडविण्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना याचे महत्त्वाचे कामकाज आहे. देशातील युवक शक्तीला जागरूक करण्याचे या योजनेद्वारे कार्य केले जाते. युवकांचे प्रभावी व्यक्तीमहत्त्व घडवण्यासाठी शिक्षण क्षेत्रातून कार्य केले जाते. प्रभावी व्यक्तिमत्त्व घडवताना सामाजिक बांधीलकीची जाण व सेवाभाव निर्माण करण्याचे कार्य महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे युवक वर्गामध्ये जाणीव निर्माण करणे हीच तर राष्ट्र सेवा होय. भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या सूचनेनुसार डॉ. सी. डी. देशमुख यांच्या

अध्यक्षतेखाली समिती नेमून युवक वर्गाला उच्चशिक्षण सुरु असताना युवकांचा राष्ट्र उभारणीमध्ये वाटा असावा अशीही योजना तयार करण्यापाठीमागची भूमिका होती. कोठारी आयोगाने १९६४-६२ मध्ये अशाच पद्धतीची शिफारस समाजसेवा विषयासाठी राष्ट्रीय सेवा योजना सुरू करण्याची सुचना देण्यात आली होती. सप्टेंबर १९६७ मध्ये कुलगुरूंच्या परीषदेमध्ये समाज सेवा विषयासाठी एक समिती निवडण्यात आली त्यानुसार कुलगुरूंच्या शिफारसीनुसार चौथ्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत आयोगाने पाच कोटी अनुदान मंजूर केले. काही निवडक महाविद्यालये, काही निवडक संस्था यांच्यावर प्रायोगिक तत्त्वावर राष्ट्रीय सेवा योजना हा प्रकल्प चांगल्या पद्धतीने सुरू झाला. या प्रकल्पाची सुरवात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जन्म शताब्दी वर्ष १९६९ मध्ये झाले होते. आज ४०२ विद्यापीठे, १६३३० कॉलेज आणि १९९९४ उच्च माध्यमिक विद्यालये सहभागी होवून एक आदर्श नागरिक म्हणून युवक वर्ग प्रतिनिधीत्त्व करत आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे ब्रीद वाक्य 'माझ्यासाठी नव्हे, तर तुमच्यासाठी'असे असून सेवा योजनेचे चिन्ह हे ओडिशा राज्यातील कोनार्कमधील सुर्य मंदीराच्या रथाच्या चाकावर आधारलेले आहे. चक्र हे गतीचे प्रतीक आहे. अलीकडच्या परस्थितीत सांगली, कोल्हापूर आणि भामरागड या ठिकाणी आलेल्या आपत्तीत राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान वाखणण्याजोगे आहे. शिवाजी विद्यापीठ कोल्हापुर यांनी आपले विद्यापीठ निवा-यासाठी, भोजनासाठी आणि मानसिक धैर्य निर्माण करण्यासाठी सर्वस्वी पुढे केलेले आहे.सध्यस्थिती मध्ये महाराष्ट्रातील विद्यार्थी आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले प्रतिनिधीत्त्व करत आहे. चीन, रशिया, दक्षिण कोरीया, श्रीलंका या देशामध्ये भारतीय शिष्ट मंडळामध्ये समाविष्ट होण्याची संधी प्राप्त झालेली आहे. मुंबई येथील के. सी. कॉलेज कार्यक्रम अधिकारी डॉ. सतीश कोलते, राष्ट्रीय सेवा योजनेमधील एक स्वयंसेवक सचिन ढोले यांना राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला हीच याच योजनेची खरीखुरी ओळख आहे. याचे मुळ शोधायला गेले तर, पंडीत नेहरू यांचेच नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल.

पंडीत जवाहरलाल नेहरू यांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे या देशाला यांनी लोकशाहीचा भक्कम आधारस्तंभ लाभू दिला परराष्ट्र धोरणाला अतिशय योग्य असा मार्मिक आकार त्यांनी दिला होता. भारताने तटस्थतेचे धोरण स्वीकारले त्याचे प्रणेते हे नेहरूच आहेत. तत्कालीन परिस्थितीत अमेरीकेच्या बाजूने जाणे योग्य ठरले नसते आणि कम्युनिस्ट असलेल्या गटात जावून बसणे आत्मघातकी ठरले असते. म्हणून तर आंतरराष्ट्रीय राजकारणात नेहरूंचे महत्त्व भल्याभल्यांनी मान्य केले आहे. नेहरूंनी गांधीजींना आदर्श मानले होते पण ग्रामीण भारताच्या विकासाचे स्वप्न गांधीजींनी पाहिले होते या वेळी मात्र गांधीजींच्या विरोधात जावून औद्योगिक व्यवस्थेत प्रशासकीय सहभागाच्या आवश्यकतेवर भर दिला सार्वजनिक उद्योगांची त्यांनी साखळी निर्माण केली. विज्ञान आणि तंत्रज्ञानावर भर दिला अणुशक्तीची उभारणी केली, भारतीय अर्थव्यवस्था मजबूत करण्याच्या दृष्टीकोनातून बोकारो, दुर्गापूर, भिलाई, राऊरकेला हे पोलाद प्रकल्प उभे करण्यात नेहरूंचा वाटा अतिशय महत्त्वपूर्ण होता. त्यावेळच्या पत्रकारांना सुद्धा नेहरूंच्या विचारविनिमयाचा फारसा अंदाज येत नव्हता. तेव्हाच्या मध्यप्रदेशात आणि आत्ताच्या छत्तीसगढ राज्यात भिलाईला सोवियत युनियनच्या मदतीने प्रकल्प निश्चित करून भूमीपुजनाचा समारंभ होता त्यावेळी पत्रकाराने त्याजागेवर टिका केली होती आणि पुढे काही वर्षात तेथील भरभराट पाहून पत्रकारांना आश्चर्यचकित होण्यावाचून दूसरा पर्याय नव्हता. ही किमया नेहरूंच्या दूरदृष्टीकोनाची, धडाडीची असल्याची दिसून येते. अटल बिहारी वाजपेयी यांनी १९७७ मध्ये परराष्ट्र मंत्री पदाची शपथ घेतली तेव्हा परराष्ट्र मंत्रालयात प्रवेश करताना तेथील अधिका-यांना एक सवाल केला की त्यांच्या त्या कार्यालयाच्या मार्गावर असलेले पंडीत नेहरूंचे भव्य तैल चित्र कोठे आहे. त्यावेळी अधिका-यांची भंबेरी उडाली. त्यांनी ते चित्र बाजूना काढून ठेवले असल्याचे सांगितले. तेव्हा वाजपेयी यांनी ते तैल चित्र पुन्हा जिथल्या तिथे लावण्यास बजावले. आणि आपण आज जगात मान उंच् करुन चालू शकतो त्यास नेहरूंचे परराष्ट्र धोरणच कारणीभूत आहे असे सांगितले. यापेक्षा मोठी पावती ते ती आणखी कोणती हवी. यावरून राष्ट्रहितासाठी परराष्ट्र धोरण नेहरूंनी किती चांगल्या प्रकारे राबविले असेल याचा साकल्याने विचार करणे गरजेचे आहे.

दुसरी पंचवार्षिक योजना, औद्योगिकीकरण, उद्योगधंदे यांना वाहिलेली होती. शांतिदूत नेहरू त्या काळी शस्त्र निर्मितीचे कारखाने वृद्धिंगत करत होते. त्यावेळी इंग्लंड आणि अमेरिका यांच्या विरोधात जावून अणूभट्टया उभ्या केल्या होत्या. विमाने व रनगाडे स्वत: तयार करण्यावरही पंडीत नेहरूंनी भर दिलेला होता. म्हणून भविष्यात १९९८ मध्ये पोखरण येथे अणुचाचण्या घेवून भारत अनवस्त्रधारी देश बनला. नेहरूंचा शांतता प्रेमाचा उगम असा राष्ट्रीय उभारणीत दिसून येतो. रशिया पासून चीन फोडणे त्यासाठी अमेरिकेचे सहकार्य मिळवणे आणि उरलेल्या वेळात औद्योगिकरणासाठी वाटचाल करणे अशी नेहरूंची भुमिका होती. म्हणून शांततावादी होणे हे नेहरूंसाठी योग्य होते. अमेरिकेला विरोध करणे म्हणजे भारत

देश विकसित मार्गावर नेवून ठेवणे हे नेहरूंनी त्यावेळी ओळखले होते. अमेरिकेचा त्यावेळीचा आग्रह औद्योगिकरण स्थगित करुन नेहरूंनी शेती विकासावर भर द्यावा असा कुटील डाव होता. त्यात चीनचे आक्रमणही त्यावेळी झालेले होते. पण चीनचा विश्वासघातकीपणा आणि अमेरिकेने त्यावेळी केलेली मदत हे चीनला धोक्याचे वाटत होते. अमेरिकेने त्यावेळी स्पष्ट इशारा दिला होता की चीन आसाम मध्ये उतरल्यास मुख्य भूमिवर हल्ला करण्यात येईल. त्यामुळे चीन पाठिमागे सरकले. या सर्व घडामोडीतून नेहरू हे ख-या अर्थाने शांतिदूत नव्हते तर ते प्रचंड मुत्सद्दी, कुटनितिज्ञ, ऐतिहासिक गोष्टीचे बारीक अध्ययन करणारे चाणाक्ष बुद्धीचे व्यक्ती होते. धर्मनिरपेक्ष, राष्ट्रीय एकात्मता साधण्यासाठी प्रेरणांची पराकाष्ठा नेहरूंनी अंर्तमुखतेनेकेलेली होती. अशा या तत्त्वज्ञ भारताच्या आधुनिकीकरणाचा ध्यास असलेल्या, भाक्रा-नांगल धरणाची उभारणी करुन हरितक्रांती घडवून आणणा-या पंतप्रधान नेहरूंवर भारतीय जनतेचा प्रचंडतेने जिद्द आणि विश्वास होता. इतिहास प्रत्येकाचे मूल्यमापन करत असतो पण तो कोणासाठी थांबत नसतो. हे ही अंतिमत: सत्य आहे.

भारतातील एक अग्रगण्य विद्यापीठ असलेले जवाहलाल नेहरू विद्यापीठ, नेहरू सायन्स सेंटर मुंबई, युवक काँग्रेस, युवक क्रांती दल, आ ॅल इंडिया स्टुडंट फेडरेशन, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, ऑल इंडिया शिख स्टुडंट फेडरेशन यासारख्या विद्यार्थी संघटना आपापल्या पक्षीय विचारसरणीबरोबर घेवून सक्रीय राजकारणात पुढे आलेले आहेत. विद्यापीठांच्या नेमक्या कार्याविषयी सांगताना पंडीत नेहरू म्हणतात की मानवतावाद, सहिष्णूता, विवेक, कल्पनांचे साहस, आणि सत्याचा शोध घेणे व मानवी उद्दीष्टाच्या दिशेने पुढे जाणे हे विद्यापीठांचे काम आहे. नेहरूंनी आंतरराष्ट्रीय राजकारणाचा विचार करत असताना सत्ता गटापासून अलिप्त राहून जवळपास पंचवीस वर्षांनी समृद्ध होणारे भारत, उद्योगप्रधान, अन्न स्वावलंबी आणि लष्करी दृष्ट्या बलवान अशा भारताची उभारणी करण्याचा नेहरूंचा प्रयत्न होता. ही त्यांची राष्ट्र उभारणीच्या दृष्टीकोनातून कठोर भूमिका दिसून येते.

निष्कर्ष (Conclusion) -

१. पंडीत नेहरूंनी शांतिदूत् पंचशिल तत्व, अलिप्तता वाद याद्वारे भारताचे परराष्ट्र धोरण निश्चित केले.
२. आधुनिक भारताच्या नियोजनामध्ये पंडीत जवाहरलाल नेहरू यांचे महत्त्वाचे योगदान आहे.
३. पंचवार्षिक योजनेमधून भारताचा विकास घडवून आणला पण याबाबतीत त्यांना संमिश्र यश आले.
४. पंडीत नेहरू यांच्या लेखनातून इतिहास व वर्तमानकाळ यांचा सुसंवाददिसून येतो.
५. राष्ट्रीय सेवा योजनेची नवनिर्मितिचे मूळ पंडीत जवाहरलाल नेहरू हेच होते.
६. देशाच्या औद्योगिक विकासातून अण्विक उर्जेचा उपयोग देशाच्या विकासासाठी पंडीत नेहरु यांनी केला.
७. पंडीत नेहरू हे भारतीय नियोजनाचे जनक म्हणून ओळखले गेले.

सारांश (Summary)-

पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून यशस्वी कामगिरी करत एक नवा इतिहास निर्माण केला आहे. कृषीप्रधान देश आणि औद्योगिक धोरण नव्याने निर्माण करुन एक नवीन विकासाचा मार्ग नेहरू यांनी देशाला देवू केला. जन्मभर राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी झगडलेला नेता, बलवान भारताची निर्मिती करणे, परराष्ट्र धोरण चांगल्या पद्धतीने राबविणे असे नेहरू यांचे कार्य होते. पण आजची तरूण पिढी नेहरूंच्या विचारसरणी, राजकारण यावर टिका करत असते. यावर काही माध्यमांचाही परिणाम दिसून येता े. ऐतिहासिक गोष्टींचा परामर्श घेवून, सिंहावलोकन करून आताचे राजकारण योग्य पद्धतीने समयसुचकता वापरुन बदलणे गरजेचे आहे. नेहरूंचे राजकारण पाहता त्यांना संमिश्र असे यश मिळाल्याचे दिसून येते. त्यांच्याकडचे नेतृत्व गूण आणि पंतप्रधान पदाचा कार्यकाल पाहता नेहरू हे राष्ट्रउभारणीसाठी योग्यच आहेच असे म्हणावे लागेल. युवकांनाहीराष्ट्रीय सेवा योजना, आणि यासारख्या अनेक संघटना यांच्या माध्यमातून त्यांना नेतृत्व करण्यासाठी वाव दिला आहे. त्यांच्या लेखन कार्यातून देश हितासाठी मार्गदर्शन मिळतच राहील असे वाटते.

संदर्भ (References) –

१. पंडीत नेहरू एक मागोवा- कुरुंदकर आणि न. गो. राजोरकर, साधना प्रकाशन १९७३
२. राज्यसभा टी. व्ही. - मुलाखत-पंडित नेहरू.
३. गाडगीळ पां. वा.,शांतिदूतनेहरू, मुंबई १९६६
४. महाराष्ट्र टाईम्स- राष्ट्रीय सेवा योजनेचा सुवर्णमहोत्सव- अतुल साळुंखे (राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना)